13 MAR 2018
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडारूपी यज्ञात खेळाडूंनी स्वतःला सिद्ध करावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : दि न्यू कॉलेजला २०१६-१७ वर्षातील खेळांमधील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूरला खेळांची खूप मोठी परंपरा आहे. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याने सातत्याने क्रीडाक्षेत्राचा विकास झाला पाहिजे, यासाठी विद्यापीठ देखील नेहमी अग्रेसरपणे कार्यरत आहे, असे सांगत क्रीडारुपी यज्ञामध्ये जोपर्यंत स्वत:ला सिध्द करीत नाही. तोपर्यंत गुणवान खेळाडूंचा उदय होत नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनीं केले. शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमात ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठच्या क्रीडा अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभाग सभागृहामध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र शासनाचा जीवन गौरव पुरस्कार प्रास बिभीषण पाटील हे उपस्थित होते.



कोल्हापूर : दि न्यु कॉलेजला सन २०१६-१७ वर्षातील खेळांमधील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा 'क्रीडा महर्षि मेघनाथ नागेशकर''. ट्रॉफी प्रदान करण्यात आली. यावेळी डावीकडून अमर सासने, प्राचार्य एन. व्ही. नलवडे, डॉ. पी. टी. गायकवाड, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, बिभीषण पाटील, डॉ. डी. आर. मोरे, माजी प्राचार्य तथा संचालक सी. आर. घोडसे, डी. डी. भोपळे, आर. पी. आढाव.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठातील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर यश संपादन करावे. यासाठी विद्यापीठामार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत. यासाठीचे विविध उपक्रम खेळाडूंपर्यंत पोहचविले पाहिजेत. प्रास केलेले यश नेहमी प्रवाही असते. यासाठी सातत्याने आपले लक्ष केंद्रीत करुन यशोशिखर गाठले पाहिजे. खेळामध्ये कौशल्य प्रास करुन कठीण परिश्रमाअंती यशस्वी होणे, हा परिवर्तनाचा प्रवास असतो, असेही कुलगुरूंनी नमुद केले.

ते पुढे म्हणाले, ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये विद्यापीठाची घौडदौड सुरु आहेच, त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रामध्ये आपले महत्वपूर्ण योगदान देवून खेळाडू नांव लौकिक करीत आहेत. क्रीडा प्रकारातील विविध कौशल्ये आत्मसात करुन खेळाडूंनी यश संपादन केले पाहिजे. खेळाडूंसाठीच्या अद्ययावत क्रीडा सुविधांमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे. विद्यापीठ विविध सुविधांसाठी पाठपुरावा करीत आहे. क्रीडा संचालकांनी जास्तीत जास्त विद्यार्थी क्रीडा प्रकारात आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही देवानंद शिंदे यांनी स्पष्ट केले.

बिभीषण पाटील म्हणाले, खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये पारंगत होवून देशाचे नाव उंचवावे. विद्यापीठाच्या खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची क्षमता आहे. त्यामध्ये वाढ करण्यासाठी आधुनिक पध्दतींचा अभ्यास करावा.

यावेळी सायटेशनचे वाचन विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातील प्रशिक्षक जे. एच. इंगळे यांनी तर प्रास्ताविक क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ.पी.टी.गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन शारीरिक शिक्षण संचालक डॉ.दीपक पाटील-डांगे यांनी तर आभार प्रदर्शन शारीरिक शिक्षण संचालक विजय रोकडे यांनी मानले.

कार्यक्रमाला विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ.डी.आर.मोरे यांच्यासह संघ व्यवस्थापक, प्रशिक्षक, खेळाडू उपस्थित होते.

### दि न्यू कॉलेजला सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळवून सर्वात जास्त ६४० गुण संपादन केल्याबद्दल दि न्यू कॉलेज, कोल्हापूरला सन २०१६-१७ ची खेळांमधील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाची 'क्रीडा महर्षि मेघनाथ नागेशकर''. ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले.

13 MAR 2018 तरुण भारत
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या सबलीकरणाकडे लक्ष देण्याची गरज

## डॉ. वैशाली पाटील : शिवाजी विद्यापीठात 'बेटी बचाव अभियानांतर्गत' कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजामधील आर्थिक उन्नतीचा विरोधाभास हा सामाजिक प्रगतीमधील मुख्य अडथळा आहे. आत्मविश्वास मिळविण्यासाठी परिस्थितीशी संयमाने सामोरे गेले पाहिजे, देशाची प्रगती साध्य करण्यासाठी महिलांच्या सबलीकरणाकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुंबई येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'बेटी बचाव अभियानांतर्गत" जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. संयोगिताराजे छत्रपती यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.

डॉ. पाटील म्हणाल्या, जिवनातील प्रतिकूल परिस्थितीमध्ये संयम वाळगण्याचे बाळकडू महिलांना मिळालेले असते. काबाड कष्ट करुन मुलांच्या शिक्षणाचा आणि संसाराचा गाडा समर्थपणे हाकण्यासाठी शेतकरी महिलांची जिद्दीने धडपड चालू आहे.



कोल्हापूर : विद्यापीठात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करताना डॉ. वैशाली पाटील. सोबत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, संयोगिताराजे छत्रपती, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. भारती पाटील आदी.

श्रीमंत युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती म्हणाल्या, सशक्त समाज घडविण्यामध्ये स्त्रियांचे फार मोठे योगदान आहे. त्यामुळे स्त्रियांनी स्वत:ला अबला समजू नये. समाज बळकट करण्यासाठी विचारांची वाईट प्रवृती नष्ट केली पाहिजे. त्याची सुरुवात घरापासूनच झाली पाहिजे.

प्रास्ताविक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. सूत्रसंचालन भूगोल अधिविभागाच्या डॉ. मीना पोतदार यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ.डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2018
पुढारी

# बौद्धीक मालमत्ता अधिकाराचे धडे घेण्याची गरज : डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** विविध क्षेत्रांत शोधनिबंध आणि संशोधन करण्यात शिवाजी विद्यापीठाने देशात पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. याला अधिक संपन्न करण्यासाठी विद्यार्थ्यांनी बौद्धीक मालमत्ता अधिकाराचे धडे घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत डॉ. शिर्के बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा झाली. यावेळी आयपीआर विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. घुले, अनिल कुलकर्णी उपस्थित होते.

13 MAR 2018
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# राष्ट्रीय 'युवा संसद'साठी विद्यापीठाची निवड

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

भारत सरकारच्या, संसदीय कार्यमंत्रालयामार्फत घेण्यात आलेल्या १४ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा आवाज राष्ट्रीय स्तरावर उमटणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी देशभरातील १५ विद्यापीठांची निवड झाली आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाचा समावेश आहे. यामध्ये ५५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यापीठात सध्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेची तयारी सुरू आहे.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी शिवाजी



राष्ट्रीय स्तरावरील युवा संसद स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाची निवड झाली आहे.

## संसदीय कार्यमंत्रालयाकडून विद्यापीठास पत्र

विद्यापीठाच्या युवा संसदेचे सादरीकरण लवकरच होणार आहे. २८ व ३१ मार्च आणि ४ एप्रिल या तीन तारखांपैकी एका दिवशी विद्यापीठात युवा संसद होणार आहे. त्रिसदस्यीय समिती परीक्षक म्हणून उपस्थित राहणार आहे. त्यामध्ये संसदीय कार्य मंत्रालयातील अधिकारी, एक खासदार व अन्य विद्यापीठातील एका प्रतिनिधीचा समावेश राहील. दरम्यान यापुर्वीची स्पर्धा २२ सप्टेंबर, २०१७ रोजी विद्यापीठात झाली होती.

दरम्यान देशभरातील १०० विद्यापीठाचे १५ ग्रुप तयार करुन प्रत्येकी एका संघाची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली आहे. संसदीय र्यमंत्रालयातर्फे नुकतेच विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवडल्याचे पत्र मिळाले आहे. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी काम पाहिले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

> **युवा संसदेच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी प्रथमच विद्यापीठाची निवड झाली आहे.युवा संसदेची रुपरेषा, नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी प्रश्नोत्तर तास, भारत चीन वाद, शेतकरी आत्महत्या, कर्जमाफी, स्वच्छ भारत अभियान, महिला व बालविकास सुरक्षा अशा विषयावर युवा संसद भरविली होती. ५५ मिनिटाची युवा संसदेचे कामकाज संसदेच्या धर्तीवर चालते.**
>
> **- प्रा. डॉ. प्रल्हाद माने,** समन्वयक

13 MAR 2018 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्याबाई उत्तम प्रशासक

## डॉ. अभंग यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माळव्याच्या जहागीरदार असलेल्या होळकर घराण्याच्या अहिल्याबाई होळकर अतिशय मुत्सद्दी, धोरणी, उत्तम प्रशासक आणि कणखर भूमिका घेणाऱ्या तत्त्वज्ञानी राणी होत्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. चंद्रकांत अभंग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या वतीने 'राजमाता अहिल्याबाई होळकर-जीवन व कार्य' या विषयावर दोन दिवसीय परिसंवादाचे आयोजन विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे होते.

डॉ. अभंग म्हणाले, खंडेराव होळकर १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईमध्ये धारातीर्थ पडल्यानंतर सासरे मल्हारराव होळकरांनी अहिल्याबाईंना सती जाण्यापासून रोखले. त्यांचे मतपरिवर्तन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'राजमाता अहिल्याबाई होळकर-जीवन व कार्य' या विषयावर बोलताना डॉ. चंद्रकांत अभंग. शेजारी डॉ. निलांबरी जगताप, डॉ. नीलिशा देसाई, डॉ. ए. बी. राजगे, डॉ. एन. डी. पारेकर.**

प्रशासकीय व सैन्याच्या कामात त्यांना मल्हाररावांनी निपूण केले हाते. १७५४ नंतर अहिल्याबाई रसद पुरवठा अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. राघोबांनी ज्यावेळेस अहिल्याबाईंवर आक्रमणाची तयारी केली त्यावेळेस इतर मराठा सरदारांनी अहिल्याबाईंचा पक्ष घेतला आणि राघोबांना माघारी फिरावे लागले. इंग्रजांच्या धोक्याकडे लक्ष वळविण्याचे मोठे काम अहिल्याबाईंनी केलेले होते. अहिल्याबाईंनी उत्तर, पूर्व, पश्चिम भारतामधील निरनिराळ्या ठिकाणच्या नदीघाट आणि मंदिरे येथे पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिलेली आहेत. हे त्यांचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे. या माध्यमातून महाराष्ट्राचा धर्म अहिल्याबाईंनी भारतभर वाढविलेला आहे, हे आपल्याला दिसून येते.

प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे म्हणाले, अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. प्रास्ताविक इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. एन. डी. पारेकर यांनी तर संयोजक डॉ. निलांबरी जगताप यांनी पाहुण्यांचा परिचय तर डॉ. निलीशा देसाई यांनी आभार मानले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी यशपाल धिंडे, विनयाताई करपेकर, दशरथ पारेकर, डॉ. अवनिश पाटील, श्रीमती छाया राजे उपस्थित होते.

13 MAR 2018 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहल्यादेवी होळकर तत्त्वज्ञानी राणी

## चंद्रकांत अभंग : शिवाजी विद्यापीठात परिसंवादाचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. १२ : 'माळव्याच्या जहागीरदार असलेल्या होळकर घराण्याच्या अहल्यादेवी होळकर अतिशय मुत्सद्दी, धोरणी, उत्तम प्रशासक व कणखर भूमिका घेणाऱ्या तत्त्वज्ञानी राणी होत,' असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक चंद्रकांत अभंग यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अहल्यादेवी होळकर अध्यासन, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त सहकार्याने 'राजमाता अहल्यादेवी होळकर : जीवन व कार्य' विषयावर आयोजित परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. अभंग म्हणाले, "खंडेराव होळकर १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईमध्ये धारातीर्थी पडल्यानंतर सासरे मल्हारराव होळकरांनी अहल्यादेवींना सती जाण्यापासून रोखत, त्यांचे मतपरिवर्तन केले. प्रशासकीय व सैन्याच्या कामात त्यांना मल्हाररावांनी निपुण केले होते. अहल्यादेवींनी रसद पुरवठा अधिकारी म्हणून कार्य केले होते. मांगरूळ भकवाडा येथील आठ गावे आपल्या ताब्यात घेण्यासाठी झालेल्या लढाईत त्यांनी तोफा, बैला अन्य युद्धसामग्री पाठविण्याचे व्यवस्थापन केले. रामपुरा, भांडपुरा या भागामध्ये तोफांचे कारखाने उभारले गेले होते. त्यांच्या जीवनातील जास्त काळ रामपुरा, भांडपुरा या गावांत गेल्याचे दिसून येते. त्यांच्याकडे सोनेरी पोषाखामध्ये स्त्रियाही होत्या. राघोबांनी ज्या वेळेस त्यांच्यावर आक्रमणाची तयारी केली, त्या वेळेस इतर मराठा सरदारांनी त्यांचा पक्ष घेतला आणि राघोबांना माघारी फिरावे लागले."



कोल्हापूर : परिसवांदात बोलताना चंदकांत अभंग.

ते म्हणाले, "अहल्यादेवींनी उत्तर, पूर्व, पश्चिम भारतामधील निरनिराळ्या ठिकाणचे नदीघाट आणि मंदिरे येथे पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिली. हे त्यांचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे. या माध्यमातून महाराष्ट्राचा धर्म त्यांनी भारतभर वाढविलेला आहे, हे दिसून येते. शेतीच्या कामामध्ये परिवर्तन करणे, भिल्लांना राज्यव्यवस्थेमध्ये सामावून घेण्याची दखल त्यांनी घेतली. महेश्वर नदीघाट व मंदिरांचे काम जवळजवळ २० ते ३० वर्षे सुरू होते. तेथील लोकांना रोजगार उपलब्ध होत होता. महेश्वरमध्ये त्यांनी महाराष्ट्र पद्धतीचा किल्ला निर्माण केला."

या प्रसंगी यशपाल धिंडे, विनया करपेकर, दशरथ पारेकर, डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. एन. डी. पारेकर यांनी प्रास्ताविक केले. संयोजक डॉ. नीलांबरी जगताप यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलीशा देसाई यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2018
Times of India

# SUK expects better response to scheme for buying books

TIMES NEWS NETWORK



**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) officials are hoping for a better response for its Teachers Personal Library Scheme (TPLS) for teaching and non-teaching faculties.

The varsity will be hosting a book festival, Granth Mahotsav, from March 18 to 20, wherein the scheme will be available for the teachers. During the same period, on March 19, the convocation ceremony is also scheduled. Hence, the response of visitors will also be high to the event.

The scheme which offers 50% discount to a teacher on purchase of books has seen poor response from teaching as well as non-teaching faculties in recent years. Under the scheme along with teachers, class one, two and three officials of the university and affiliated colleges are allowed 50% grant on purchasing of books.

The scheme, according to the university officials, is valid twice a year where a teacher or official has to submit an application form for the grant. According to the university official less than 500 staffers submit applications for the scheme, which offers a total budgetary provision of Rs 3 lakh in the scheme.

The official added that the scheme which was earlier restricted to teachers in all the university affiliated colleges was extended to class one, two and three officials from the academic year 2012-13.

The budgetary provision too was earlier restricted to Rs 1.5 lakh which was doubled to Rs 3 lakh. Under the scheme teachers can buy books with respect to their field of expertise. "The Granth Mahotsav will be held on the university campus and this is the 11th year of the initiative," a university official said.